# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): सोलापुर ग्रामीण **P.S.**(ठाणे): पंढरपूर शहर

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0061 **Year** (वर्ष): 2023

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 21/01/2023 00:33

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): शुक्रवार

**Time Period** (कालावधी):

**Date From** (दिनांक पासून): 20/01/2023
**Date To** ( दिनांक पर्यंत): 20/01/2023
**Time From** (वेळेपासून): 11:12 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 13:16 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 21/01/2023 **Time** (वेळ): 00:00 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No.** (नोंद क्र.): 002

**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 21/01/2023 00:33 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

पूर्व, 1 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): स्टेशन रोडवरील गोल्डन , टी व पंढरपूर शासकीय,विश्रामगह

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
*(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):*

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव): पंढरपूर शहर

**District(State)** (जिल्हा(राज्य)): सोलापुर ग्रामीण(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): तुषार उर्फ बालाजी तानाजी नागटिळक

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1990

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सुस्ते,पंढरपूर तालुका,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सुस्ते,पंढरपूर तालुका,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9850217057

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. रणजीत मारुती मोरे | | | 1. औदुंबर नगर, पंढरपूर शहर, सोलापुर [illegible], महाराष्ट्र, भारत |
| 2 | शरद रामचंद्र मोरे | | | 1. मुंढेवाडी, पंढरपूर [illegible], सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधित मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs.) (मूल्य (रु.)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दि:- 20/01/2023मी तुषार उर्फ बालाजी तानाजी नागटिळक, वय- 33 वर्षे, व्यवसाय - शेती रा. सुस्ते, ता. पंढरपूर जि. सोलापूर, समक्ष उपस्थित राहून फिर्याद देतो की,मो नं 9850217057मी दि. 20/01/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर येथील पोलीस निरीक्षक श्री महाडिक यांचेशी फोन द्वारे संपर्क साधुन लाच मागणीबाबत थोडक्यात तक्रार सांगीतली. त्यावरुन पोनि महाडिक यांनी मला आज दि. 20/01/2023 रोजी जिल्हा न्यायालयाच्या समोरील पंढरपूर - सांगोला रोडवर येण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी सदर ठिकाणी येवुन थांबलो असता तेथे काहीवेळातच पोनि महाडिक शासकीय वाहनाने आले. तेथे पोनि महाडिक यांनी मला वाहनात बसण्यास सांगुन तेथे उपस्थित असलेले दोन शासकीय पंचांची व माझी एकमेकांशी ओळख करुन दिली. त्यानंतर पोनि महाडिक यांचे सुचनेवरून दोन्ही पचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी सांगीतलो की,

मी दि. 15.01.2023 रोजी माझे नातेवाईक यांच्या शेतातुन अमर लामकाने यांचा जेसीबी भाडे तत्वावर घेवुन मुरुम काढत असतेवेळी पंढरपूर तहसिल कार्यालय येथील मंडळ अधिकारी रणजीत मोरे व खाजगी इसम शरद मोरे यांनी सदर ठिकाणी कोणतीही पंचनामा कारवाई न करता जेसीबी ताब्यात घेवून, माझ्या टीपर ट्रक मधुन चोरीच्या मुरुमची वाहतुक झाली असल्याबाबत सांगुन त्यावरून माझ्यावर कोणताही गुन्हा दाखल न करण्यासाठी तसेच कोणताही दंड न आकारता ताब्यात असलेला जेसीबी सोडण्यासाठी 1,00,000/- रुपये लाचेची मागणी करीत असुन मला पंढरपूर शहरातील स्टेशन रोड येथे असलेल्या गोल्डन टी येथे बोलाविले असल्याचे सांगुन, मंडळ अधिकारी रणजीत मोरे व खाजगी इसम शरद मोरे यांच्यावर योग्य ती कारवाई करावी ही विनंती अशी तक्रार सांगीतली व तशी सविस्तर तक्रार हस्तलिखित नोंदविली. त्यानंतर पोनि महाडिक यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून त्या व्हाईस रेकॉर्डमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले त्यानंतर मंडळ अधिकारी मोरे तसेच खाजगी इसम शरद मोरे यांचेवर पडताळणी करण्याचे अनुषंगाने मला तसेच पंच 01 यांना योग्य त्या सुचना देवुन, त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्याकडील चारचाकी वाहनातून पंढरपूर शहरातील स्टेशन रोड येथे असलेल्या गोल्डन टी येथे पाठविले. सदर ठिकाणी मी व पंच 01 असे गेलो असता तेथे मंडळ अधिकारी मोरे व खाजगी इसम शरद मोरे तसेच मी भाडेतत्वावर घेतलेल्या जेसीबीचे मालक अमर लामकाने यांचे काका पंकज लामकाने असे उपस्थित होते. सदर ठिकाणी शरद मोरे व मंडळ अधिकारी रणजीत मोरे यांनी माझ्याकडे पैश्यांची मागणी केली त्यावर मी तडजोड करण्याचा प्रयत्न केला त्यावर शरद मोरे व मंडळ अधिकारी मारे हे माझा टिपर जप्त करण्याबाबत बोलु लागले त्यामुळे मी त्यांना थोडेवेळ येथेच थांबा पैसे घेवुन येतो असे सांगीतले. व पंच 01 यांच्यासह पुन्हा पोनि महाडिक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेथे पोनि महाडिक यांनी मला व पंच 01 यांना हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण खात्री केली.

त्यानंतर मंडळ अधिकारी रणजीत मोरे व खाजगी इसम शरद मोरे यांच्यावर सापळा कारवाई करण्याच्या अनुषंगाने सर्व सापळापुर्व कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर माझ्याकडे फक्त 60,000/- रुपये असल्याबाबत मी पोनि महाडिक यांना सांगीतले असता पोनि महाडिक यांनी उर्वरीत 40,000/- हे खेळण्यातले नोटा वापरण्याचे ठरविले. त्याअनुषंगाने मी हजर केलेली लाच रक्कम 60,000/- रुपयांच्या नोटांना तसेच 40,000/- रुपयांच्या खेळण्यातील नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटांचा बंडल माझ्या नेसते पॅन्टच्या उजव्या खिश्यामध्ये ठेवण्यात आल्या. त्यानंतर मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या-त्यांच्या कामाच्या अनुषंगाने पोनि महाडिक यांनी योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मंडळ अधिकारी मोरे व खागजी इसम शरद मोरे यांच्यावर सापळा कारवाई करण्याकरीता व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्याकडील चारचाकी वाहनातुन पंढरपूर शहरातील स्टेशन रोड येथे असलेल्या गोल्डन टी येथे रवाना केले. तसेच आमचे पाठोपाठ पोनि महाडिक, पंच 02 व सापळा पथक असे शासकीय वाहनातुन सदर ठिकाणी येवुन

परिसरात सापळा लावुन थांबले. मी व पंच 01 असे गोल्डन टी येथे गेलो असता सदर ठिकाणी खाजगी इसम शरद मोरे व पंकज लामकाने असे होते. सदर ठिकाणी मोरे हे चलनाचे पैसे म्हणुन मंडळ अधिकारी यांच्या लाचेच्या रक्कमेची मागणी करु लागले. त्यावर मी त्यांना मंडळ अधिकारी यांचेसमक्ष देतो असे म्हणालो असता शरद मोरे यांनी मला हॉटेलच्या बाहेर आणुन त्यांच्या मोटार सायकलवर बसण्यास सांगुन सरगम चौकातुन मेंकॅनिकल लाईन येथे घेवुन गेले आमचे पाठमागे पोनि महाडिक व सापळा पथक असे सदर ठिकाणी आले. तेथे काहीवेळात पंकज लामकाने व अमर लामकाने हे देखील त्यांची चारचाकी गाडी घेवुन आले.

त्याठिकाणी शरद मोरे यांनी मला गाडीमध्ये पंकज लामकाने यांच्याकडे पैसे देण्यास सांगीतले. त्यावेळी देखील मी त्यांच्याकडे पैसे देण्यास नकार देवुन सर्कल भाऊसाहेब यांच्याकडे देणार असे सांगीतले त्यावर पंकज लामकाने यांनी मंडळ अधिकारी मोरे यांना फोन केला असता मंडळ अधिकारी मोरे यांनी आम्हाला पंढरपूर शासकीय विश्रामगृह येथे येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी, पंकज लामकाने व शरद मोरे असे पंकज लामकाने यांच्या टोयोटा इटीऑस मधुन शासकीय विश्रामगृह येथे गेलो. व अमर लामकाने हे शरद मोरे यांची मोटार सायकल घेवुन निघुन गेले. आम्ही शासकीय विश्रामगृह येथे गेलो असता तेथे मंडळ अधिकारी मोरे हजर होते. तेथे मंडळ अधिकारी मोरे यांनी माझ्याकडे पैश्याची मागणी केली परंतु सदर ठिकाणी पोनि महाडिक व सापळा पथक पोहचलेले नसल्याने मी पैसे कमी असल्याचा बहाणा करुन माझा मित्र पैसे घेवुन येत असल्याबाबत सांगीतले. त्यानंतर काहीवेळात पोनि महाडिक व सापळा पथक असे सदर ठिकाणी येवुन सापळा लावला असल्याबाबत मला समजल्याने मी मंडळ अधिकारी मोरे यांना आहेत तेवढे देवु का असे विचारुन माझ्या उजव्या खिशात ठेवण्यात आलेली लाचेची रक्कम काढुन मंडळ अधिकारी मोरे यांचे समोर धरली असता मंडळ अधिकारी मोरे यांनी सदरची रक्कम शरद मोरे यांच्याकडे देण्यास सांगितली. त्याप्रमाणे मी सदरची रक्कम शरद मोरे यांना दिली असता शरद मोरे यांनी ती लाचेची रक्कम घेवुन त्यांच्या नेसते पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर मी पोनि महाडिक व सापळा पथकास दिसेल असा लाच स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावरुन पोनि महाडिक, दोन्ही पंच व सापळा पथक असे सदर ठिकाणी येवुन मंडळ अधिकारी रणजीत मोरे, खाजगी इसम शरद मोरे व पंकज लामकाने यांना पकडले. सदर ठिकाणी पोनि महाडिक यांनी तिघांना त्यांचे नाव गाव विचारले तसेच सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करुन पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही अँन्टी करप्शन ब्युरो, सोलापूरच्या कार्यालयात पूर्ण करण्यात आली. त्यानंतर पोनि महाडिक यांनी पंकज लामकाने यांच्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने विचारपूस केली असता त्यांनी सांगीतले की, ते जेसीबीच्या अनुषंगाने दि. 16.01.2023 रोजी मंडळ अधिकारी मोरे यांना भेटण्यास गेले असता मंडळ अधिकारी मोरे यांनी त्यांना बालाजीला 01 लाख रुपयांचे चलन माझ्याकडे भरायला सांग, त्याने चलन भरले की मी तुझा जेसीबी सोडुन देतो असे सांगीतले. सदरवेळी मला मंडळ अधिकारी मोरे हे शासकीय चलन भरण्यास सांगत असल्याबाबत समज झाल्याने, तसेच आमचा जेसीबी लवकर सुटावा या उद्देशाने मी बालाजी यांना लवकर चलनाची रक्कम भरा म्हणुन तगादा लावला होता. मंडळ अधिकारी मोरे यांनी चलन म्हणुन मागीतलेली लाच रक्कम ही शासकीय फी असल्याबाबत माझा समज झाल्याने मी बालाजी यांच्याकडे मागणी केली असल्याबाबत सांगत आहेत. त्यावरुन पंकज लामकाने यांच्याकडे अधिक तपास करण्याची दक्षता घेवुन सध्या मंडळ अधिकारी रणजीत मोरे व खाजगी इसम शरद मोरे यांच्याविरुध्द पुढील कारवाई करण्याचे ठरविण्यात आले.

तरी दिनांक 20.01.2023 रोजी आरोपी लोकसेवक श्री. रणजीत मारुती मोरे, वय - 37 वर्षे, पद - मंडळ अधिकारी, तहसिल पंढरपूर, रा. औदुंबर नगर, ता. पंढरपूर जि. सोलापूर व खाजगी इसम शरद रामचंद्र मोरे वय 37 वर्षे, व्यवसाय - शेती, रा. मुंढेवाडी ता. पंढरपूर जि. सोलापूर यांनी आपले स्वतःचे फायद्याकरीता मुरुम उत्खननाकरीता मी भाडे तत्वावर घेतलेला जेसीबी दि. 15.01.2023 रोजी ताब्यात घेवून, माझ्या टीपर ट्रक मधुन चोरीच्या मुरुमची वाहतुक झाली असल्याबाबत सांगुन त्यावरुन माझ्यावर कोणताही गुन्हा दाखल न करण्यासाठी अथवा कोणताही दंड न आकारता ताब्यात असलेला जेसीबी सोडण्यासाठी चलन म्हणुन पंढरपूर शहर येथील स्टेशन रोडवरील गोल्डन टी येथ 1,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम पंढरपूर शासकीय विश्रामगृह येथे स्विकारली आहे म्हणुन माझी नमुद आरोपी यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला स.ता.म.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Arun Ramchandra Pawar(I (Inspector)) / AIOPP7809G **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

T.NagHIqK

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

F.I.R ची प्रत मिळाली

T.NagHIqK

पोलीस ठाणे अंमलदार
पंढरपूर शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Arun Ramchandra P.
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): AIOPP7809G